



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३३२ ■ शुक्रवार ४ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26



**डॉ.गौतम शाह धुळ्यात उपलब्ध**

गुडघे दुखी, कंबरदुखी, स्लीप डिस्क, संधीवात, सायटीका या रुग्णांवर ओझोन थेरपी व गुडघ्याची इंजेक्शन थेरपीने यशस्वी उपचार

दि.७ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत धुळे येथे उपलब्ध असणार आहेत. स.१० ते २ दु.

संपर्क :- डॉ.गौतम शाह M.S. (ऑर्थो) शाह क्लिनिक श्री.विठ्ठल हॉस्पीटल, जुने आस्था हॉस्पीटल, रामवाडीसमोर, मालेगावरोड, धुळे (फोन नं.०२५६२-२३५११३) भ्रमणध्वनी-०८६००३५१०००/९८८१२७८६९८


मराठा आंदोलनाचे मराठवाड्यात तीव्र पडसाद

## परभणी, लातूरमध्ये शाळा-महाविद्यालयांना सुटी बाजार बंद बीड-धाराशिव-नांदेडमध्ये बंदची हाक

**जालना, दि. ३ : जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सहा दिवसांपासून उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावल्याने सर्वत्र पडसाद उमटू लागले आहेत. परभणी, लातूर, बीड, धाराशिव आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये उद्या (दि. ४) बंदची हाक देण्यात आली आहे. अनेक ठिकाणी बाजारपेठा, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या आहेत. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काही जिल्ह्यांमध्ये शाळा आणि महाविद्यालयांनाही सुटी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, अंतरवाली सराटीत आंदोलनासाठी आलेल्या दशरथ रायकर या तरूणाचा मृत्यू झाला आहे.**




उपोषणाफुळे जरांगे-पाटील यांची प्रकृती खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर मराठा समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सरकारच्या भूमिकेचा निषेध करण्यासाठी मराठवाड्यात आंदोलनाची तीव्रता वाढली आहे. परभणी, लातूर, बीड, धाराशिव आणि नांदेड या जिल्ह्यांमध्ये उद्या बंदची हाक देण्यात आली आहे. अनेक ठिकाणी बाजारपेठा, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापना बंद ठेवण्यात आल्या आहेत. काही जिल्ह्यांमध्ये शाळा आणि महाविद्यालयांनाही सुटी जाहीर करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्यात सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये (पान ४ वर)

### अजित पवार मृत्यूबाबत नाना पटोलेंचा गंभीर आरोप



मुंबई, दि. ३ : दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यूच्या प्रकरणावरून राज्य सरकार आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. या दुर्घटना प्रकरणी अद्याप पोलिसांत एफआयआर नोंदवण्यात आलेली नसल्याचा मुद्दा उपस्थित करत खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारला सवाल केला होता. आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही या प्रकरणावरून राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहेत.

अजित पवार यांच्या मृत्यू प्रकरणात फडणवीस सरकार काहीतरी लपवत असल्याचा आरोप (पान ४ वर)

## जामन्यापाणी येथे सात कोटी अडूसष्ट लाखांचा गांजा जप्त शिरपूर ता.पोलीस व वनविभागाची संयुक्त करवाई

**शिरपूर दि.३ (का.प्र.)- तालुक्यातील अतिदुर्गम भागात बेकायदेशीररीत्या करण्यात आलेली गांजाची शेती शिरपूर तालुका पोलीस ठाणे आणि वन विभागाच्या संयुक्त पथकाने उद्ध्वस्त केली. या कारवाईत तब्बल तीन हजार बहात्तर किलो वजनाची गांजा सदृश्य वनस्पतींची उभी पिके आढळून आली असून, त्यांची अंदाजे किंमत सात कोटी अडूसष्ट लाख रुपये असल्याची माहिती प्रशासनाने दिली.**



एक सप्टेंबरला जामन्यापाणी वनक्षेत्रालगत आजूबाजूच्या परिसरात अज्ञात इसमांनी गांजा सदृश्य वनस्पतीची लागवड केल्याची गोपनीय माहिती वन विभाग व पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, प्रभारी अधिकारी, तालुका पोलीस ठाणे यांना मिळाली. त्यानंतर ही माहिती धुळे येथील मा. मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आली. एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ५२अ नुसार दुर्गम भागातून गांजा वाहून आणणे शक्य नसल्याने, न्यायालयाच्या देखरेखीखाली मालमत्तेची यादी तयार करून मुद्देमाल नष्ट करण्यासाठी विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या छापा कारवाईसाठी नियुक्ती करण्यात आली. (पान ४ वर)

## जाहिरात दर तात्पुरता कमी करण्याचा मनपाचा निर्णय आ.अनुप अग्रवालांसह महापौर परदेशी यांची सुचना

**धुळे, दि.३- आगामी गणेशोत्सव तसेच पुढील धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील मंडळे, सामाजिक संस्था आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी धुळे महानगरपालिका प्रशासनाने तात्पुरत्या जाहिरात फलकांच्या शुल्कात ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत शहराचे आ.अनुप अग्रवाल आणि महापौर मायादेवी परदेशी यांनी मनपा प्रशासनास सूचना केल्या होत्या. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.**



धुळे शहरात गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या कालावधीत मंडळे, संस्था आणि नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर शुभेच्छा, स्वागत तसेच विविध उपक्रमांचे जाहिरात फलक व बॅनर लावले जातात. या काळात भाविक नागरिक व सामाजिक संस्थांना आर्थिक दिलासा मिळावा, अशी मागणी नागरिकांकडून होत होती. या पार्श्वभूमीवर आमदार श्री. अनुपभैया अग्रवाल व महापौर सौ. मायादेवी परदेशी यांनी प्रशासनास तात्पुरत्या जाहिरात शुल्कात कपात करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार सध्या लागू असलेले तात्पुरते जाहिरात शुल्क ४ रुपये प्रति चौ.फूट असून, धार्मिक उत्सवांच्या कालावधीत ते २ रुपये प्रति चौ.फूट करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित मंडळे, संस्था व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मात्र ही सवलत केवळ ७ जाहिरात फलकांपर्यंतच मर्यादित राहणार आहे. सातपेक्षा अधिक जाहिरात फलक लावल्यास अतिरिक्त फलकांसाठी पूर्वीप्रमाणे लागू असलेले शुल्क आकारण्यात येईल. तसेच जाहिरात फलक उभारण्यासाठी नियमानुसार महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक राहणार आहे. अनधिकृत (पान ४ वर)

### जिरीबाम मध्ये ऐंशी कोटींची ब्राऊनशुगर जप्त; एक अटकेत

जिरीबाम, दि. ३ : मणिपूरच्या जिरीबाम जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मोठी कारवाई करत तब्बल ८० कोटी रुपयांची ब्राऊन शुगर जप्त केली आहे. आसाम रायफल्स आणि जिरीबाम पोलिसांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली. याप्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जिरीबाम परिसरातील माखा बस्ती येथे गुरुवारी गुप्त माहितीच्या आधारे संयुक्त पथकाने शोधमोहीम राबवली. या कारवाई दरम्यान संशयित व्यक्तीच्या ताब्यातून दहा किलो ८९१ ग्रॅम ब्राऊनशुगर हस्तगत करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाची अंदाजे किंमत ८० कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीसह (पान ४ वर)



## आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नी सत्यशोधक विद्यार्थी संघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**नवापूर, दि.३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्रातील विविध भागांतील आदिवासी विद्यार्थी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी गेल्या १९ दिवसांपासून आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाला पाठिंबा देत सत्यशोधक विद्यार्थी संघटना व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा यांच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार दत्तात्रय जाधव यांच्या मार्फत गुरुवारी, ३ सप्टेंबर रोजी निवेदन देण्यात आले.**

आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना सुरक्षित व सुसज्ज वसतिगृह, पौष्टिक भोजन, स्वच्छ पाणी, वीज, स्वच्छतागृह, आरोग्य सुविधा आणि सुरक्षित वातावरण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. मात्र, अनेक आश्रमशाळा व वसतिगृहांची दुरवस्था झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.लालबारी, नवापूर येथील वसतिगृह अचानक बंद करण्यात आले असून, वसतिगृहाच्या इमारतीचे तातडीने बांधकाम करून विद्यार्थ्यांना सुरक्षित व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच जळपवळई आश्रमशाळेतील मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपये नुकसानभरपाई द्यावी व पात्र कुटुंबीयांना शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये घडलेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूच्या सर्व घटनांची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई (पान ४ वर)

### बॅनर लावतांना मृत्यू निपक्ष चौकशी करा- मुंदडा

धुळे, दि.३- बॅनर लावताना विजेचा तीव्र शॉक लागून कै. चेतन गोपाल मराठे या निष्पाप युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची अत्यंत गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते अनिल मुंदडा यांनी केली आहे.

या दुर्घटनेमागे नेमका कोणाचा निष्काळजीपणा, कर्तव्यात कसूर किंवा कायद्याचे उल्लंघन झाले आहे, याचा शोध घेणे आवश्यक असल्याचे मुंदडा यांनी स्पष्ट केले. बॅनर लावणारे आयोजक, कंत्राटदार आणि तो छापणारी प्रिंटिंग प्रेस यांनी सुरक्षेच्या नियमांचे व परवानग्यांचे पालन केले होते का, तसेच जवळील उच्चदाब विद्युत वाहिन्यांबाबत खबरदारी घेतली (पान ४ वर)



छाया- वैभव मदाने

## खा.राहुल गांधींचे अभिजीत राऊतांनी केले स्वागत

नाशिक, दि.३- नाशिक विमानतळावर लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. संगठन सृजन अभियान अंतर्गत नाशिक येथे महाराष्ट्रातील जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरला राहुलजींच्या उपस्थितीने नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल असे मत अभिजीत विजय राऊत, पंचवटी ब्लॉक अध्यक्ष- नाशिक शहर काँग्रेस, नाशिक यांनी व्यक्त केले.

पुणे येथे झालेल्या कार्यक्रमास राहुल गांधींना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला होता. या पार्श्वभूमीवर त्यांच्या नाशिक दौऱ्याची तरूण वर्गाला मोठी उत्सुकता होती. नाशिक मधील या प्रशिक्षण शिबीरात अनेक तरूणांना त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. त्यातून पक्ष संघटनेला नवीन ऊर्जा आणि नवी दिशा मिळाली असे मत नाशिक पंचवटी ब्ललॉक कमिटीचे अध्यक्ष रॉत यांनी व्यक्त कले.

मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

## विरोधी पक्ष नेत्याच्या निवडीबाबत मनपाने चार आठवड्यात निर्णय घ्यावा

**धुळे, दि.३-धुळे महानगरपालिकेतील विरोधी पक्ष नेता कोण असावा याबाबत महापालिकेतर्फे कोणताही निर्णय घेतला जात नसल्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने नोटीस मिळाल्यापासून चार आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश दिले आहेत. विशेष म्हणजे एमआयएमच्या नगरसेवकांनी १२ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या पत्राचा प्रामुख्याने विचार करा व नियमानुसार निर्णय घ्या असे सूचित केले आहे.**

धुळे महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्वाधिक जागा भाजपाला मिळाल्या होत्या. त्या खालोखाल दहा जागा एमआयएम पक्षाला मिळाले होते.या निवडणुकीत निवडणूक घोषित झाल्यानंतर शिवसेना शिंदे गट व अजित पवार राष्ट्रवादी गट यांची युती झाली होती.यामध्ये सेनेला पाच तर राष्ट्रवादीला आठ अशा तेरा जागा मिळाल्या होत्या.यामुळे त्यांनी देखील विरोधी पक्षासाठी दावा केला होता. निवडणुकीत जागावाटप काही जागांवर झाले. काही जागांवर एकमेकांच्या विरुद्ध उमेदवार देण्यात आले होते. या युतीची नोंद निवडणुका घोषित होण्यापूर्व आयुक्तांकडे नोंदविणे आवश्यक होते.मात्र त्यानंतर ती नोंद करण्यात आली होती. अशाच एका घटनेमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने सहा जून २०१५ ला दिलेल्या निर्णयात सेक्शन १९ नुसार दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष जो असेल त्याला विरोधी पक्ष पद द्यावे असा निर्णय दिलेला आहे.

या निर्णयाला अनुषंगून एम आय एम तर्फे आपला पक्ष सुचवेल त्या व्यक्तीस विरोधी पक्षनेता म्हणून नेमणुकीचे पत्र द्यावे असे नमूद करत कायद्यातील सर्व बाबींचा उल्लेख करीत १२ फेब्रुवारी २०२६ ला पत्र दाखल करण्यात आले होते. या पत्रावर महापालिकेने (पान २ वर)

## सरकारच्या भूमिकेविरोधात मराठा समाज आक्रमक नकाणे तलावात जलसमाधी आंदोलन; अनर्थ टळला

**धुळे : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत धुळे जिल्हा सकल मराठा समाजाने आज आक्रमक भूमिका घेतली आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आज ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता धुळे शहरातील नकाणे तलावावर जलसमाधी आंदोलन करण्यात आले.यावेळी पोलीसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने अनर्थ टळला.**



सरकारने मराठा आरक्षणाबाबत यापूर्वी दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करावीत, तसेच हैदराबाद, सातारा, मुंबई गॅझेटसह आरक्षणाच्या सर्व मागण्यांवर त्वरित ठोस निर्णय घ्यावा, अशी समाजाची मागणी आहे. सरकारच्या निष्क्रियतेचा निषेध म्हणून आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी जलसमाधी घेण्यासाठी पाण्यात धाव घेतली. यावेळी आंदोलकांना धरपकड करताना पोलिसांची मोठ्या प्रमाणात धावपळ झाली. यावेळी धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील आणि त्यांचे सर्व सहकारी यांनी तातडीने या ठिकाणी धाव घेत सर्व आंदोलकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. (पान ४ वर)

संशयित अद्याप मोकाट

## धुळ्यात औरंगाबादच्या पत्रकारावर कोयत्याने हल्ला; डोक्याला गंभीर ईजा

**धुळे, दि.३- येथील चाळीसगाव रोडवरील गजानन कॉलनीत कौटुंबिक मालमत्तेच्या हिस्सेवाटणीवरून वाद झाला. या वादातून एकावर लोखंडी कोयता, कुऱ्हाडीचा दांडक्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. मारहाण करणारे चारही संशयित अद्यापही बेपत्ताच असून पोलिसांकडून तपास संथपणे सुरू असल्याचे दिसते.**

संभाजीनगर येथील पत्रकार अलीम बेग मासूम बेग (वय ४८ ) येथील गजानन कॉलनीत (अबरार मशिदीजवळ, धुळे) वास्तव्यास असलेले सलीम चांद बेग यांच्या घरी आले होते. तेथे जावई रईस बेग यांच्या मालमत्तेच्या हिस्सेवाटणी संदर्भात काही जणांसोबत चर्चा सुरू होती. चर्चा सुरू असताना शाब्दिक वाद होऊन वादाचे पर्यावसान मारहाणीत झाले.



अलीम बेग यांच्या डोक्यावर संशयित शाहरुख चांद बेग याने वार करून गंभीर दुखापत केली. अलीम वेग यांच्यासोबत असलेले अहमद बेग अन्वर बेग यांनाही मारहाण केली, त्यांच्या पाठीवर कुऱ्हाडीच्या उलट्या दांडक्याने मारहाण केली, ठार मारण्याची धमकीही दिली. (पान ४ वर)

### रेणुका टेकडीवर वृक्षारोपण संपन्न

शहादा, दि.३ (प्रतिनिधी)- येथील अनरद बारीवर असणाऱ्या रेणुका माता टेकडीवर नालंदा अभ्यासिका केंद्र अनरद यांच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. सुरुवातीला या संस्थेच्या सर्व सदस्यांचे प्रा.संपत कोठारी व राजेंद्र माळी यांनी स्वागत केले. ज्येष्ठ सदस्य अॅड.गोविंद पाटील यांनी वृक्षारोपणची गरज आवश्यकता व सामाजिक सहभाग याविषयी आपले विचार मांडले. रेणुका टेकडीवर नालंदा अभ्यासिका केंद्र च्या (पान २ वर)

## जनतेने थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीचा लाभ घ्या- जाधव

**धुळे, दि.३- धुळे जिल्हा न्यायालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीच्या निमित्ताने थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफीचा लाभ नागरिकांना घेता येणार आहे.**



शहरातील ज्या मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कराची थकबाकी आहे, त्यांनी राष्ट्रीय लोकअदालतीच्या माध्यमातून शास्ती माफीचा लाभ घेत तातडीने थकीत कर भरून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन वसुली अधीक्षक शिरीष जाधव यांनी केले आहे.

१२ सप्टेंबर रोजीच शास्ती माफीचा लाभ उपलब्ध होणार असून त्यानंतर ही सवलत मिळणार नाही, त्यामुळे थकबाकीदार मालमत्ताधारकांनी संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त नितीन कापडणीस (पान २ वर)







## शेळ्या-मेंढ्या चोरीच्या घटनांत कोणतीही ठोस कारवाई नाही १५ दिवसांत छडा न लावल्यास पो.स्टेशनला सहकुटूंब ठिय्या

सोनगीर दि. ३(प्रतिनिधी)- सोनगीर, नरडाणा आणि शिंदखेडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या काही महिन्यांपासून शेळ्या-मेंढ्या चोरांच्या टोळीने धुमाकूळ घातला आहे. पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने या निर्ढावलेल्या चोरांची हिंमत दिवसेंदिवस वाढली असून, मेंढपाळ आणि शेतकरी वर्गात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरीच्या या घटनांचा १५ दिवसांच्या आत छडा न लावल्यास मेंढपाळ बांधव संपूर्ण कुटुंबासह पोलीस ठाण्यातच मुक्काम ठोकतील, असा इशारा आमदार गोपीचंद पडळकर यांच्या समर्थक व मेंढपाळ विकास परिषदेच्या नेत्या शारदाताई पांढरे यांनी दिला आहे.




गुरुवारी मेंढपाळ विकास परिषदेच्या माध्यमातून शारदाताई पांढरे यांनी सोनगीर व नरडाणा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय व राज्य महामार्गालगतच्या भागातून सातत्याने पशुधनाची चोरी होत आहे. अनेक घटनांची रीतसर नोंद पोलीस ठाण्यात होऊनही अद्याप एकाही गुन्ह्याची उकल झालेली नाही. पोलीस प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे चोरटे मोकाट फिरत आहेत. (पान २ वर)


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,43,350 रु.+3% GST

सोने- 24 K -1,55,800 रु.+3% GST

चांदी- 2,40,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३

# आपला महाराष्ट्र

## सत्यापलापाची व्याख्या स्पष्ट होण्याची अपेक्षा

मराठा आरक्षणातील अडचणी आणि जात पडताळणीसाठी येणाऱ्या अडचणी शासनाने सोडवाव्यात यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसले आहे. दरवेळी जरांगे उपोषण करतात. दरवेळी सरकार आपले प्रतिनिधी त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी पाठविते. त्यावर चर्चेच्या अनेक फैरी झडतात. प्रसिद्धी मिळते. काही मागण्या मान्य केल्या जातात आंदोलन स्थगित होते आणि प्रत्येक जण आपापल्या कामात दंग होतो. काही काळ गेल्यानंतर पुन्हा उपोषण केले जाते आणि मुंबईत मराठा समाजाचा मोर्चा धडकणार असल्याचे इशारे दिले जातात. वारंवार अंतरवाली सराटीत उपोषणाचे रणसिंग फुंकले जाते. सत्याग्रहाचा मंत्र किंवा साधन महात्मा गांधींनी या देशाला दिलेला आहे. आज महात्मा गांधी यांना विरोध करणारे किंवा शिव्या देणारे देखील याच अस्त्राचा वापर करतात. मनोज जरांगे पाटील देखील यातलेच आहेत. ते गांधींचे नाव कधीच घेत नाहीत पण मार्ग त्यांचाच अवलंबतात. त्याशिवाय त्यांनाही पर्याय नसतो. सरकारच्या वतीने त्यांच्याकडे बोलणी करण्यासाठी राधाकृष्ण विखे पाटील गेलेले आहेत. ते नेहमीच जात असतात. एकंदरीतच ही प्रक्रिया लुटुपुटूची वाटते. आम्ही मारल्यासारखे करतो तुम्ही रडल्यासारखे करा असेच काहीतरी आरक्षणाच्या संदर्भात घडत आहे. प्रत्यक्षात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार आरक्षणाची टक्केवारी संविधानातील तरतुदीच्या पलीकडे जाऊ शकत नाही म्हणून सांगितलेले आहे. असे असले तरी प्रत्येक वेळी वेगवेगळ्या मार्गाने आरक्षणाचे मुद्दे पुढे केले जातात. आणि मराठा समाजाला ओबीसी मध्ये हिस्सा मिळावा यासाठी प्रयतक केले जातात. यात गैर असे काही नाही मात्र सरकार त्याबाबत उदासीन असते आणि मनोज जरांगे पाटील आग्रही असतात त्यातून त्यांनी सत्याग्रहाचे शस्त्र अतिशय बोथट करून ठेवलेले आहे. पुढच्या काळात त्याचा प्रभाव पडणार नाही अशी अवस्था येऊ शकते.

सरकार काहीही म्हणत असले तरी हा प्रश्न पूर्णपणे सुटावा असे सरकारला वाटत नाही असे दिसते. म्हणूनच प्रत्येक वेळी वर वरची डागडुजी करून आजचे मरण उद्यावर ढकलले जाते. सरकारचे प्राधान्यक्रम वेगळेच असतात. एल निनो च्या प्रभावामुळे कमी जास्त पाऊस राज्यात पडत आहे. जुलैमध्ये झालेल्या पावसानंतर ऑगस्टमध्ये पावसाने ओढ दिली आणि जोरावर आलेली पिके आता पावसाअभावी करपू लागलेली आहेत. ज्यांच्या शेतात ठिबक सिंचन आहे त्यांनी पिके जिवंत ठेवण्याचा आटापिटा केलेला आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांची मात्र पंचाईत आहे. काही जिल्ह्यांनी आमच्या जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी देखील केलेली आहे. तर काहींनी कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा अशी मागणी केलेली आहे. परंतु शासन अशा कुठल्याही प्रश्नावर गंभीर असल्याचे दिसत नाही. निम्म्या राज्यावर दुष्काळाची छाया असताना सरकार आणि त्यांचे पक्ष वेगळ्याच उद्योगात गुंतलेले आहेत. जंतर-मंतर वरील जेन झींच्या आंदोलनानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तरुणांच्या प्रश्नांवर आघाडी घेत रान उठविले आहे. त्यामुळे शासकांचे नेहमीचे अस्त्र देखील निरुपयोगी ठरत असून त्यामुळे ते सैरभैर झाल्याचे दिसते. म्हणून सत्तेत असूनही प्रतिक्रियावादी सत्ताधारी असा चेहरा त्यांना धारण करावा लागत आहे. कधी कधी त्यांचे लोकप्रतिनिधी आंदोलकांच्या भूमिकेत दिसतात. त्यांना भलतेच प्रश्न सतावत असल्याचे दिसते. पुण्यात झालेल्या शासक पक्षाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी आपली लढाई सत्यापलापाशी असल्याचे म्हटले आहे. विरोधक सत्यापलाप करीत आहेत असे त्यांना वाटते. त्यांचा हा आरोप वास्तववादी असो की नसो विरोधकांवर आरोप करताना तसेच बोलावे लागते. पूर्वीही विविध शासक विरोधकांवर टीका करीत असत परंतु ती विधायक असायची. आता तीव्र झालेली आहे. विरोधकांना नेस्तनाबूत करण्याची भाषा केली जाते. नेतेच नव्हेत तर खालचे कार्यकर्ते देखील तशीच भाषा वापरतात. ही एक प्रकारची विकृतीच म्हणावी लागेल.

काँग्रेसने नक्षलवाद्यांपासून स्फूर्ती घेऊन देशात अराजक माजविण्याचा विडा उचलला आहे. असा शासन प्रमुखांचा आरोप भयानकच म्हणावा लागेल. सरकारविरोधी भूमिका घेणे आणि जे अयोग्य असेल त्यावर प्रहार करणे हे विरोधकाचे कामच असते. तशी टीका पचवण्याची क्षमता असली पाहिजे. ती नसेल तर विरोधकांचे आरोप जिव्हारी लागतात आणि त्यातून प्रतिक्रिया उमटते. राज्यघटनेचे नाव घेऊन मूल्य पायदळी तुडवणे आणि अराजक पसरविणे असे काम काँग्रेसकडून सुरू आहे असाही त्यांचा आरोप आहे. अराजकाची व्याख्या मात्र त्यांनी स्पष्ट केलेली नाही. किंवा नेमके काँग्रेसने काय केलेले आहे हेही सांगितलेले नाही. खिशियानी बिल्ली खंबा नोचे अशातलाच हा प्रकार म्हणावा लागेल. जंतर-मंतरवर कॉक्रोच जनता पार्टीचा उगम झाला त्यांची उपस्थिती राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेत होती. १८० संस्थांपैकी अनेकांवर शहरी नक्षलवादाचा आरोप होता. त्यांना निवडणुका लढायच्या नसतात उत्तरे द्यायची नसतात फक्त खोटे बोलायचे असते.त्या संघटना नवे नाव घेऊन उतरल्या आहेत. सी जे पी च्या मागे सुद्धा त्याच संघटना आहेत असा शोध परवा पुण्यात बोलताना शासकांनी लावला. काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम अशी संभावनाही शासक पक्षाच्या कार्यक्रमात करण्यात आली. वास्तविक प्रत्येक पक्ष आपण सत्तेत यावे यासाठी प्रयतक करतच असतो त्यामुळे काँग्रेस जिताओ यात काही गैर नाही आणि त्याबद्दल दु:ख वाटण्याचेही काही कारण नाही. पण तेवढे देखील सहन होत नाही अशी सध्या सत्तेत असलेल्यांची अवस्था आहे. पुण्यातल्या छात्रो की गुंज या राहुल गांधी यांच्या कार्यक्रमाला मिळालेला प्रचंड प्रतिसाद लक्षात घेता आपणही युवा पिढीपर्यंत पोहोचलो पाहिजे असे प्रतिपादन या बैठकीत करण्यात आले. त्यानुसार कदाचित त्यांचे कार्यकर्ते युवा पिढीपर्यंत पोहोचतील मात्र जो विभाजनवादी कार्यक्रम आहे. तो घेऊन त्यांना आता जाता येणार नाही. त्याबद्दलची मानसिकता ज्या पिढीची होती त्याच पिढीचे पुढचे शिलेदार तो विचार ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. मग नेमके हे कार्यकर्ते जेन झी कडे काय घेऊन जाणार असा प्रश्न स्वाभाविकपणे पुढे येतो.

मुद्दा असा आहे की, या पलीकडे राज्याचे अनेक प्रश्न आहेत. सध्या तर शेतकरी प्रचंड अडचणीत आहे. त्यांना सरकारने कर्ज माफ करून जरूर दिलासा दिला असे असले तरी पाऊस नसल्याने आगामी संकट मोठे आहे. त्यावर मात्र व्यवस्था बोलत नाही. सुमारे २८ जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे. पावसा अभावी पिण्याच्या पाण्याचे प्रश्न तीव्र होणार आहेत. दोन कोटी हून अधिक नावे एस आय आर च्या माध्यमातून महाराष्ट्रात वगळली जाणार आहेत. त्याची कुणालाच चिंता नाही. विरोधक आणि विविध संघटना या संदर्भात ओरडाआरडी करत असले तरी त्यांचा आवाज सत्ताधिशांपर्यंत पोहोचत नाही. परिणामी एवढ्या मोठ्या संख्येवर ते मतदार नसल्याचे आणि पर्यायाने नागरिक नसल्याचे बालंट येऊ शकते. उच्च न्यायालय निर्णय देत असले तरी पीओपीच्या गणपतीबाबत सरकारची भूमिका कधीच स्पष्ट होत नाही. पर्यावरण पूरक गणपतीची संकल्पना पंतप्रधानांनी आवाहन करूनही आकाराला येत नाही. ही बाब राज्य सरकारला नामुष्कीची आहे. परंतु लोकानुनयाच्या हव्यासा पोटी सरकार अतिउत्सवी गणेश भक्तांना आवर घालू शकत नाही. पुण्यात एकट्या व्यक्तीने डीजे आणि तीव्र प्रकाशझोत याबाबत आवाज उठवला आणि सगळे अस्वस्थ झाले. मात्र शासन अधिकृत अशी भूमिका घेत नाही. डीजे मुळे बहिरे पण येवो की, हृदयाघाताची शक्यता असो, आम्हाला त्याची पर्वा नाही कारण आम्हाला आमच्या अंधभक्तांची मर्जी सांभाळावयाची आहे अशीच भूमिका शासकांची नेहमी असते. आताही तशीच आहे म्हणूनच लोक जरी ओरडत असले तरी शासकांना काही फरक पडणार नाही. असे असंख्य प्रश्न आहेत की ते सोडविण्याचे खुद्द सरकार समोर आव्हान आहे मात्र त्याकडे लक्ष देण्याच्या ऐवजी विरोधकांवर केवळ हल्ला करणे एवढाच उद्योग शासकांकडे शिल्लक असल्याचे दिसते.

## काँग्रेसची ताकद वाढविण्याची गरज राहुल गांधींचा जिल्हाध्यक्षांना कानमंत्र

**नाशिक, दि.३ (विश्वास मदाने)- आगामी काळात काँग्रेसची संघटनात्मक ताकद वाढविताना केवळ राष्ट्रीय पातळीवरील राजकीय मुद्द्यांवर अवलंबून न राहता प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक प्रश्नांवर पक्षाने आक्रमकपणे काम करावे, जनतेशी थेट संवाद साधावा आणि त्यांच्या प्रश्नांसाठी मैदानात उतरावे, अशी दिशा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी (दि.२) दिली. पक्षात नव्या नेतृत्वाची फळी उभी करण्यासाठी मानसिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम तरुण कार्यकर्त्यांना पुढे आणण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.**

काँग्रेसच्या मसृजन संघटनफ उपक्रमांतर्गत नाशिकमध्ये आयोजित राज्यातील जिल्हाध्यक्षांच्या दहा दिवसीय शिबिराचा समारोप राहुल गांधी यांच्या उपस्थितीत झाला.

राज्यातील ७२ पैकी ६९ जिल्हाध्यक्ष या शिबिरात सहभागी झाले होते. समारोहापूर्वी राहुल गांधी यांनी जिल्हाध्यक्षांशी स्वतंत्रपणे संवाद साधत त्यांच्या जिल्ह्यातील संघटनात्मक परिस्थिती, स्थानिक समस्या आणि पक्षाच्या कामकाजाचा आढावा घेतला.

शिबिरात मजागतिक राजकारण आणि भारतफ या विषयावर मार्गदर्शन करताना राहुल गांधी यांनी जागतिकीकरण, देशाची अर्थव्यवस्था, रोजगार आणि उत्पादन क्षेत्रातील आव्हानांवर भूमिका मांडली. भारतात रोजगाराच्या पुरेशा संधी निर्माण करण्यासाठी अंतर्गत उत्पादनाला चालना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. चीनकडून होणारी मोठ्या प्रमाणातील आयात कमी करून देशातील उत्पादनक्षमता वाढविणे आणि रोजगारनिर्मितीवर भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

बेरोजगारी, विद्यार्थ्यांच्या अडचणी, नागरी सुविधांचा अभाव, आदिवासी व मागासवर्गीयांचे प्रश्न यांसारख्या संवेदनशील विषयांवर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी जनतेची भूमिका समजून घेत ठामपणे उभे राहावे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या प्रश्नांवर केवळ निवेदने देणे किंवा आंदोलनांची घोषणा करणे पुरेसे नाही. त्यासाठी लोकांमध्ये जाऊन त्यांचे म्हणणे ऐकणे आणि प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाध्यक्षांनी पक्षाची वैचारिक भूमिका स्पष्टपणे जनतेपर्यंत पोहोचवावी. आंदोलन करताना पक्षाची विचारधारा आणि त्याच्या मर्यादा यांचे भान ठेवावे, असा सल्लाही त्यांनी दिला. आपल्या राजकीय भूमिकेचा दाखला देताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या कार्यालयाची पायरी न चढण्याची भूमिका असल्याचेही त्यांनी स्पष्ट केल्याचे सांगण्यात आले.

### तरुण नेतृत्वाला संधी

काँग्रेसमध्ये भविष्यातील नेतृत्व तयार करण्यासाठी तरुण कार्यकर्त्यांना अधिकाधिक संधी देण्याचे संकेत राहुल गांधी यांनी दिले. पक्षात पुढे येणारा कार्यकर्ता केवळ राजकीयदृष्ट्या नव्हे, तर मानसिक, शारीरिक आणि आर्थिकदृष्ट्याही सक्षम असावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. आज संघटनेत तयार होणारी ही तरुण फळीच भविष्यात आमदार आणि खासदार म्हणून पुढे येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### गांधींनी घेतला खड्ड्यांचा अनुभव

नाशिकच्या रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न बुधवारी (दि.२) काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. जिल्हाध्यक्षांच्या शिबिरासाठी नाशिकमध्ये आलेल्या राहुल गांधी यांनी शहरातील रस्त्यांची दुरवस्था आणि त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाची माहिती जाणून घेतली. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख रस्त्यांची कामे आणि वाहतूक व्यवस्थेवर प्रशासनाकडून भर दिला जात असताना अनेक भागांतील खड्डे अद्याप कायम आहेत. या पार्श्वभूमीवर काँग्रेस कार्यकर्त्यांनी नाशिकच्या रस्त्यांच्या प्रश्नाकडे राहुल गांधी यांचे लक्ष वेधले.

### पान १ वरुन

## जनतेने थकीत मालमत्ता करावरील

व वसुली अधीक्षक शिरीष जाधव यांनी केले आहे. राष्ट्रीय लोकअदालती संदर्भातील नोटिसा थकीत करधारकांना देण्यात येत असून संबंधितांनी नोटिसीची दखल घेऊन मनपाचा थकीत कराचा भरणा करावा, असे आवाहन प्रभाग ११, १२, ३, १५ यांचे वसुली अधीक्षक शिरीष जाधव यांनी सांगितले.

महापालिकेची थकबाकी वसुली वाढविण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न सुरू असून नागरिकांनी वेळेत कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन वसुली अधीक्षकांनी केले आले आहे.

## रेणुका टेकडीवर वृक्षारोपण संपन्न

वतीने ५० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यांना जाळ्या लावून संरक्षण व पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

याप्रसंगी रेणुका ट्रस्ट अध्यक्ष राजेंद्र महाजन, सचिव ज्ञानी कुलकर्णी, खजिनदार प्रा.संपत कोठारी, ॲड.गोविंद पाटील, प्रताप माळी, नालंदा अभ्यासिका केंद्राचे संदीप महिरे, मनोज महाजन, कैलास बागले, भास्कर बागले, शरद बोरसे, संजय महिरे, दयानंद महिरे, गौतम महिरे, उद्धव कापुरे इत्यादी सदस्य उपस्थित होते. वृक्षारोपण करून पर्यावरण राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन याविषयी नालंदा अभ्यासिकाच्या सदस्यांनी रोपण व रेणुका माता परिसर सुशोभित करण्याचे अभिवचन दिले. या याप्रसंगी शरद फटकाळ त्यांच्या धर्मपतकी सीमा फटकाळ या परिवाराने देखील या ठिकाणी वृक्षारोपण केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. संपतराव कोठारी यानी केल्. याप्रसंगी नालंदा अभ्यासिका सदस्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संपत कोठारी यांनी केले. राजेंद्र माळी यांनी स्वागत केले त्यांनी कुलकर्णी यांनी आभार मानले.

## विरोधी पक्ष नेत्याच्या निवडीबाबत

कोणताच निर्णय घेतला नव्हता.दुसरीकडे शिंदे सेना व राष्ट्रवादी या दोघांतर्फे विरोधी पक्षाचे नेतेपद आपल्या युतीतील नगरसेवकाला मिळावे यासाठी जोरदार प्रयतक सुरू होते.

एम आय एम तर्फे इर्शाद जागीरदार यांच्या पुढाकाराने अब्दुल लतीफ अब्दुल हमीद अन्सारी व इतर नगरसेवक यांच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर उच्च न्यायालयात रीट पिटीशन दाखल करण्यात आले होते. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाचे संभाजीनगर खंडपीठाचे न्यायमूर्ती श्री. आबासाहेब डी शिंदे व न्यायमूर्ती श्री.नितीन बी सूर्यवंशी यांनी निकाल देताना स्पष्ट केले की, धुळे महापालिकेने चार आठवड्याच्या आत १२.२.२०२६ रोजी एमआयएम ने दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने नोटीस मिळाल्यापासून चार दिवसांच्या आत योग्य तो कायदेशीर निर्णय घ्यावा असे सूचित केले आहे. यामुळे महापालिका आता काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पान १ वरुन

## शेळ्या-मेंढ्या चोरीच्या घटनांत कोणतीही ठोस कारवाई नाही

यावेळी पुढील मागण्यांचे निवेदन पोलीस प्रशासनाला देण्यात आले. ते असे,सोनगीर, नरडाणा आणि शिंदखेडा हद्दीतील पशुधन चोरीच्या सर्व घटनांचा विशेष पथक नेमून तात्काळ तपास करण्यात यावा.महामार्गालगत व संवेदनशील ठिकाणी असलेले बंद पडलेले सीसीटीव्ही कॅमेरे त्वरित दुरुस्त करून कार्यान्वित करण्यात यावेत. दरम्यान,येत्या १५ दिवसांत या चोरांचा बंदोबस्त न झाल्यास मेंढपाळ बांधव आपल्या कुटुंबकबिल्यासह व शेळ्या-मेंढ्यांसह पोलीस ठाण्याच्या आवारातच मुक्काम ठोकतील. तसेच मेंढपाळांच्या या आंदोलनाचे नेतृत्व करत आपण स्वतः पोलीस ठाण्यासमोर आमरण उपोषणाला बसू, असा निर्वाणीचा इशारा सामाजिक कार्यकर्त्या शारदाताई पांढरे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.गेल्या काही महिन्यांपासून धुळे जिल्ह्यातील सोनगीर व परिसरात शेळ्या, बोकड व मेंढ्यांची चोरी होण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. महामार्गावरून जाणाऱ्या अज्ञात वाहनांमधून रात्रीच्या वेळी पशुधन लांबवले जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अनेक गरीब मेंढपाळांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असलेल्या पशुधनाची चोरी होत असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. वारंवार तक्रारी करूनही तपास लागत नसल्यामुळे आता मेंढपाळ आक्रमक भूमिकेत आले आहेत.निवेदन देतेवेळी मेंढपाळ ठेलारी समाजाचे नेते नानाभाऊ पडळकर, शिवसेना तालुकाध्यक्ष दीपक चोरमले, मेंढपाळ संघटनेच्या संभाजीनगरच्या मीराताई जानराव, रामचंद पडळकर, बाळू पडळकर, बापू सरगर, लखन ठेलारी, लालचंद टेळे, वसंत कोळपे, विठ्ठल गोयेकर, सावळीराम कोळपे, गोरख ठेलारी, नारायण शिरोळे यांच्यासह सर्व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तु. जि. धुळे पो. तु. जि. धुळे मौजे मोराणे प्र. ल. ता. जि. धुळे धुळे म. न. पा. वाढीव हद्दीतील गट क्रमांक व उपविभाग क्र. ११/१/ब२ पैकी प्लॉट नं. ३७ चे क्षेत्र १४०.२५ चौ. मी. चा बखळ प्लॉट त्यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ३६, दक्षिणेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ३८, आणि गट क्रमांक व उपविभाग क्र. ११/१/ब२ पैकी प्लॉट नं. ३८ चे क्षेत्र ७०.१२ चौ. मी. चा बखळ प्लॉट त्यांसी चतु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ३५, दक्षिणेस: प्लॉट ३७, उत्तरेस : प्लॉट ३९ अशा मिळकती या श्री. लोटन गंगाराम लोहार रा. बजरंग कॉलनी, साक्री रोड, धुळे ता.जि. धुळे यांचे नावे व ताबे उपभोगातील आहेत.

येणे प्रमाणे वर्णनाचे मिळकती आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा श्री. लोटन गंगाराम लोहार यांचेशी केलेला असून त्यांना बयाणा पोटी रक्कम देखील दिलेली आहे. आमचे अशिल हे लवकरच नोंदणीकृत व्यवहार करणार आहेत.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचा गहाण,सौदा, खरेदी, विक्री, कर्ज, तथा संच बोझा आदी कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत सदर हरकत, हक्क, अधिकार अथवा हितसंबंधा बाबतचा लेखी पुरावा आमच्याकडे खालील पत्त्यावर स्वत: समक्ष येवून, आणून देवून त्याची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्बोज, निर्वेध आहे, असे समजून सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. त्यानंतर सदर बाबतीत आलेली कोणतीही हरकत आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. व खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आमचे अशिलांचे सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे दि. ०३/०९/२०२६.

**ॲड.चंद्रशेखर आर.तेले**
१४, रामदास नगर, साक्री रोड, महिंदळे शिवार, धुळे ता. जि. धुळे
मो. ७५८८३१९९२०


### प्रकाश में आज इज्जतदार




दिलीप कुमार माधुरी दिक्षीत गोविंदा शक्तीकपूर रघुवरण अनुपमखेर

### शब्दकोडे क्रमांक : २४४६



**आडवे शब्द :** १.मुलीचे लग्नापूर्वीचे किंवा आई-वडिलांचे घर ३.मिरचीचा स्वाद ५.जो जुना नाही असा,नवीन ७.शिरा बनवण्यासाठी लागणार मुख्य घटक ८.संकट काळात मिळणारा निवारा किंवा आश्रय ९.देव्हाऱ्यात सुवास पसरवण्यासाठी लावली जाणारी काडी ११.तोरा १२.झाडांनी वेढलेला मोठा विस्तीर्ण प्रदेश, जंगल १४.एखादी गोष्ट वारंवार करून केलेली प्रॅक्टिस १५.सेवा करणारा सेवक किंवा नोकर १७.चहा, कॉफी किंवा व्यसनाची येणारी तीव्र इच्छा १९.सोबत किंवा बरोबर असणे २०.द्रव पदार्थ मोजण्याचे एक परिमाण २२.मध्य रेल्वेतील एक स्थानक वा कळवणे या अर्थी २४. आनंद,गंमत किंवा करमणूक २७.महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील एक प्रसिद्ध ऐतिहासिक शहर २९.एखाद्या गोष्टीची भासणारी टंचाई किंवा उणीव ३१.मध्ये न थांबता एकापाठोपाठ एक येणारे ३३.प्रकाश किंवा तेजाचा झोत वा अंश ३४.नवरा मुलगा ३५.नावासमोर लावले जाणारे एक आदरयुक्त पद ३७.अंतर कमी असणे, समीप ३८.पंथ ३९.डोंगराळ भागात मिळणारे काळे गोड-आंबट रानमेव्याचे फळ ४०.धावण्याची क्रिया किंवा वेगाची हालचाल ४२.महान, श्रेष्ठ किंवा मोठी व्यक्ती ४३.उन्हाळ्यात प्यायले जाणारे लिंबू-साखरेचे थंड पेय ४५.६ आणि ८ यांच्या मधील संख्या ४६.फोडणीत वापरली जाणारी सुवासिक पाने ४७.जंगलात राहणारे किंवा अनियंत्रित, हिंस्र **उभे शब्द :** १.संगीतातलं एक राग २.दुसऱ्याचे चांगले पाहून वाटणारा मत्सर किंवा असूया ३.दुसऱ्या क्रमांकाच्या नंतर येणारा अनुक्रम ४. जो खोटा नाही असा,सत्य किंवा प्रामाणिक ५.तुरळक,विरळ ५अ.दिन ६.विजेचा दिवा किंवा प्रकाश देणारे साधन ८.नियोजन ९.राजस्थानातील एक पर्वत रांग १०अंड्याच्या आतील पिवळा भाग १२.राअ-उलट लिहा १३.बोर्ड,सूचना दर्शवणारा फळा १४.होकार १५.दोन आणि दोन मिळून तयार होणारी संख्या १६.सुट्टी १८.फळांची केलेली शेती २१.रायगडावरील प्रसिद्ध कडा २३.पवन २५.लाकूड कापण्याचे साधन २६.पतीचे वडील २८.बुद्धी २९.सरोज ३०.धातूचा बारीक तंतू ३२.त्वरेने ३३.रुचकर ३६सोबती ३८.आगीचा उठलेला लोट ४०.नाश

### शब्दकोडे क्रमांक : २४४५ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पं | त | प्र | धा | न | | खां | दा | | व | | का |
| ग | वा | | म | त | ल | ब | | सा | | क | ला |
| त | | क्यू | | म | त | | पो | ख | र | ण | |
| | गो | | अ | स्त | | पा | क | ळी | | ख | त |
| पा | ड | स | | क | रं | ग | ळी | | ता | र | पा |
| म | | ला | भ | | गा | ल | | ख | री | | स |
| र | क | म | | चो | री | | ते | | ख | ल | |
| | द | | ख | च | | सा | ल | सा | | बा | द |
| भ | र | पू | र | | रा | व | | ग | रू | ड | |
| ग | दा | | व | ल | य | | पा | र | ख | | म |
| | न | व | स | | ग | व | त | | व | ज | न |
| नी | | जा | | ला | ड | | क | र | त | ल | |












## पटेल शैक्षणिक संकुलात शिक्षकांना स्कॉलरशिप परीक्षा प्रशिक्षण संपन्न

शिरपूर, दि.३१- येथील आर. सी.पटेल शैक्षणिक संकुलाच्या प्राथमिक विभागातील तिसरी व चौथी वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी स्कॉलरशिप स्कॉलरशिप मार्गदर्शनपर प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणाचा संस्थेतील १३० शिक्षक व मुख्याध्यापकांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

सदर प्रशिक्षण हे शिरपूर एज्युकेशन सोसायटी व नवनीत फाउंडेशन यांच्या वतीने घेण्यात आले. दोन दिवसीय स्कॉलरशिप प्रशिक्षण शिबिरात इयत्ता चौथी व तिसरी वर्गाला शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. गणित संबोध कार्यशाळेचे राज्यस्तरीय सुलभक योगेश शिवाजी महाजन यांनी बुद्धिमत्ता विषयाचे मार्गदर्शन केले. राज्यस्तरीय सुलभक देवेंद्र तानाजी पाटील यांनी गणित विषयाचे मार्गदर्शन केले. नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक संस्थेतील सेवानिवृत प्राचार्य रंगनाथ गंगाधर भवर यांनी मराठी विषयाचे मार्गदर्शन केले. नवनीत फाऊंडेशनचे सचिन जोशी यांनी नवदिशा ॲप विषयी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणात शिक्षकांना लेखन साहित्य देण्यात आले. तसेच प्रशिक्षणात कृतीयुक्त प्रशिक्षण घेण्यात आले. दरवर्षी आर.सी.पटेल शैक्षणिक संस्थेतील स्कॉलरशिप परीक्षेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत असतात. यासाठी दरवर्षी वेगवेगळ्या पातळीवर प्रयतक केले जातात. यातूनच स्कॉलरशिप शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण घेण्यात आले. मागील वर्षापासून स्कॉलरशिप परीक्षा ही इयत्ता चौथी व सातवी वर्गासाठी करण्यात आली आहे. आर.सी. पटेल शैक्षणिक संस्थेत इयत्ता तिसरी वर्गापासून स्कॉलरशिप परीक्षेची तयारी करून घेतली जाते.

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव अंतर्गत नागरिकांची आरोग्य तपासणी होणार

**धुळे, दि.१ - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निरोगी महाराष्ट्राच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून जिल्ह्यात माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियान राबविण्यात येत आहे. अभियानाच्या पुढील टप्प्यात ३० वर्षे व त्यावरील महिला व पुरुषांची आरोग्य तपासणी, निदान, उपचार तसेच आवश्यकतेनुसार पुढील उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी १ सप्टेंबर ते १० डिसेंबर २०२६ या कालावधीत शंभर दिवसांचे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.**

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागातील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी तसेच संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून अभियानाचे नियोजन करण्यात आले आहे.

असंसर्गजन्य आजारांचे लवकर निदान केंद्रस्थानी बदलती जीवनशैली, वाढता ताणतणाव तसेच अन्य कारणांमुळे नागरिकांमध्ये असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढत आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच तोंडाचा, स्तनाचा आणि गर्भाशय मुखाचा कर्करोग यांसारख्या आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास त्यांचे योग्य व्यवस्थापन व वेळेत उपचार करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे अशा आजारांचे लवकर निदान करण्यावर या अभियानात विशेष भर देण्यात येणार आहे. अभियानांतर्गत वर्षे व त्यावरील नागरिकांची मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच तोंडाचा, स्तनाचा व गर्भाशय मुखाच्या कर्करोगासाठी प्राथमिक तपासणी करण्यात येईल. तपासणीमध्ये संशयित आढळणाऱ्या नागरिकांना पुढील तपासणी व उपचारासाठी संबंधित आरोग्य संस्थेकडे संदर्भित करण्यात येणार आहे. तपासणीपासून निदान, उपचार आणि त्यानंतरच्या पाठपुराव्यापर्यंत आवश्यक कार्यवाही सुनिश्चित करण्यात येणार आहे.

अभियानाची अंमलबजावणी सात टप्प्यांत करण्यात येणार आहे. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, वर्षांवरील नागरिकांची नोंदणी, पहिल्या टप्प्यात गावपातळीवर प्रथम तीन गावांतील नागरिकांची तपासणी, दुसऱ्या टप्प्यात उर्वरित गावांतील नागरिकांची तपासणी, उपकेंद्र स्तरावरील तपासणी, तालुका व जिल्हास्तरावरील तपासणी आणि आवश्यक आरोग्य सेवा यांचा समावेश आहे. उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच तोंडाचा, स्तनाचा किंवा गर्भाशय मुखाचा कर्करोग यांचे लवकर निदान झाल्यास वेळेत उपचार करणे शक्य होते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या जवळच्या उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र किंवा संबंधित शासकीय आरोग्य संस्थेत जाऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी आणि अभियानाचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले आहे. अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्रामपंचायती, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवी संस्था तसेच नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत आरोग्य तपासणीची सुविधा पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत.

तीस वर्षांवरील प्रत्येक नागरिकाची तपासणी; निरोगी कुटुंब, निरोगी गाव आणि आरोग्य संपन्न जिल्ह्याकडे वाटचाल हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे.

## संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव

धुळे, दि.३- देवपूरातील संत सेना नगरातील श्री विठ्ठल रखुमाई सेवा ट्रस्टतर्फे दि.२ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सवानिमित्त हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाच्या कालावधीत दररोज सकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ८ ते १० या वेळेत दि.२ सप्टेंबर रोजी ह.भ.प. नाना महाराज धुळेकर , दि. ३ रोजी ह.भ.प.रामचंद्र महाराज मालपूरकर, दि.४ रोजी ह.भ.प.दत्तात्रय महाराज वरपाडेकर, दि.५ रोजी ह.भ.प.आनंद महाराज धुळेकर, दि.६ रोजी ह.भ.प.अशोक महाराज विखरणकर, दि.७ रोजी प्रमोद महाराज महाले व दि.८ सप्टेंबर रोजी ह.भ.प.गोकुळ महाराज शिंदे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. ८ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. अशी माहिती प्रमोद महाले यांनी दिली.


**DECLARATION**

We Zakir Husain Abdul Majid and Sanjida Bano Zakir Husain solemnly declare that our girl child old name was **ZHABIYA MISHKAT ZAKIR HUSAIN** and now our child new name is **ZAHABIYA MISHKAAT ZAKIR HUSAIN ANSARI**
Add:4695 31 Lane No 14 Makka Masjid Madhavpura Dhule-424001

**NAME CHANGE**
MY OLD NAME WAS **FIROZA BI ASGAR ALI SAYYAD** MY NEW NAME IS **FIROZA BI RABBANI SHAH**
ADD- PLOT NO.115, CHALISGAON ROAD JAM KAMALA, DHULE-424001.

**NAME CHANGE**
MY OLD NAME WAS **SHAH TANZILA PARVIN ASHFAQUE ALI** MY NEW NAME IS **TANZILA PARVIN MUHAMMAD FAIZ SHAH**
ADD- PLOT NO.136, BEHIND SHRWAJANIK HOPITAL, DHULE-424001.

**CHANGE OF NAME**
MY OLD NAME WAS **SUFIYA BANO MASAUD AHMAD** MY NEW NAME IS **SUFIYA BANO MASAUD AHMAD ANSARI**
ADD- MAULVIGANJ 363/289, IQBAL MANZIL, QALANDAR CHOUK, DHULE-424001.

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS **SHAIKH SHAHINA BI HAROON** AND MY NEW NAME IS **SHAHINA BI WASIM BAGWAN**
ADDRESS: SHIVAJI NAGAR, 80 FEET ROAD, DHULE - 424001

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS **NAZMIN BI SHAIKH FARID TAMBOLI** AND MY NEW NAME IS **NAZMIN MOENUDDIN TAMBOLI**
ADD: MOLVIGANJ, NEAR MOLANA AAZAD SCHOOL, DHULE-1

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS **WAHID IMAM** AND MY NEW NAME IS **WAHID IMAMBAX MANSURI**
ADD:181, GALI N 1, LALA SARDAR NAGAR, DEOPUR, DHULE-424002

**CHANGE OF NAME**
MY OLD NAME WAS **AARIF AHMAD ABDUL LATEEF** MY NEW NAME IS **AARIF AHMAD ABDUL LATIF ANSARI**
ADD- GH.NO.4374, GALLI NO.5, NEAR NURANI MASJID, ISLAMPURA, DEOPUR, DHULE-424001.

**CHANGE OF NAME**
MY OLD NAME WAS **RAHEMAT BANO JAWEED IQBAL** MY NEW NAME IS **RAHEMAT BANO JAWEED IQBAL ANSARI**
ADD- PLOT NO.13, MADINA PARK, NEAR RAAT RANI HOTEL, FIRDOUS NAGAR, DHULE-424001.

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS **FAIZAN MOHD FAROOQUE** AND MY NEW NAME IS **ANSARI FAIZAN MOHD FAROOQUE**
ADDRESS: 353, MOULVI GANJ, NEAR YAKUB SETH FACTORY, DHULE - 424001

**CHANGE NAME**
MY OLD NAME WAS **PATHAN RUBINABIBI MUNAFKHAN** AND MY NEW NAME IS **RUBINA BI MOHSIN KHAN**
ADDRESS: AGRA ROAD, GREEN HOTEL MAGE, DEOPUR, DHULE-424002

**CHANGE NAME**
MY OLD NAMES WAS **1) SHABANA HASAN SHAIKH 2) SHABANABANO HASAN SHAIKH** AND MY NEW NAME IS **SHABANA SHAIKH HASAN TAMBOLI**
